**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.०५)**

**सोमवार दिनांक १८ मे २०२६**

**ठळक बातम्या**

1. **विदर्भातील शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी जलसंवर्धन हीच प्रभावी गुरुकिल्ली असल्याचं केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचं जलक्रांती परिषदेत प्रतिपादन.**
2. **महाराष्ट्र विधानपरिषदेच्या १६ जागांसाठीच्या द्वैवार्षिक निवडणुकीचं वेळापत्रक जाहीर; १८ जूनला मतदान आणि २२ जूनला मतमोजणी होणार.**
3. **विदर्भात वाढत्या आंतरजातीय विवाहांचं प्रमाण स्वागतार्ह असल्याचं केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांचं प्रतिपादन.**
4. **शंभर रुपयांच्या बनावट नोटा छापून त्या चलनात आणण्याचा प्रयत्न करणाऱ्या नागपुरातल्या चौघा जणांना गडचिरोली पोलिसांद्वारा अटक.**
5. **अकोल्यात उष्माघाताचा दुसरा बळी, विदर्भातील अनेक जिल्हयांत उष्णतेच्या तीव्र लाटेचा इशारा.**

-------------------------------------------

जलक्रांती परिषद

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी विदर्भातील शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी जलसंवर्धन हीच प्रभावी गुरुकिल्ली असल्याचं प्रतिपादन केलं. पूर्ती सिंचन समृद्धी कल्याणकारी संस्थेच्या रौप्य महोत्सवानिमित्त नागपुरात आयोजित जलक्रांती परिषदेत ते बोलत होते. प्रत्येक गावात नदी खोलीकरण, रुंदीकरण आणि जलसाठा निर्माण करण्यासाठी लोकचळवळ उभी करण्याचं आवाहन त्यांनी केलं. राज्याचे जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी राज्य सरकारने जलसंधारणासाठी २०० कोटी रुपयांची तरतूद केल्याची माहिती दिली. नाम फाउंडेशनचे संस्थापक अभिनेते नाना पाटेकर यांनी गाव आणि पाण्यासाठी सर्व संस्थांनी एकत्र येऊन काम करण्याचे आवाहन केले, याशिवाय त्यांनी त्यांच्या संस्थेच्या कामाच्या विस्ताराची माहिती दिली -

***(होल्ड बाईट - नाना पाटेकर - २४ सेकंद)***

नाम फाउंडेशनचे सचिव मकरंद अनासपुरे यांनी शाळा-महाविद्यालयांत जलसंधारण प्रशिक्षणाची गरज व्यक्त केली. शेतकऱ्यांच्या समस्यांकडे समाजाने संवेदनशीलतेने पाहण्याची गरज व्यक्त करत निसर्गाचा आपण विचार केला नाही, तर निसर्गही आपला विचार करणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला. या परिषदेत जलसंवर्धन क्षेत्रातील उल्लेखनीय कार्यासाठी विविध जलप्रहरींचा सत्कार करण्यात आला.

---------------------------------------------

विधान परिषद निवडणूक

केंद्रीय निवडणूक आयोगानं महाराष्ट्र विधान परिषदेच्या १६ जागांसाठीच्या द्वैवार्षिक निवडणुकीचं वेळापत्रक जाहीर केलं आहे. स्थानिक स्वराज्य संस्थामधून निवडून द्यायच्या सोलापूर, अहिल्यानगर, ठाणे, जळगाव, सांगली-सातारा, नांदेड, यवतमाळ, पुणे, भंडारा- गोंदिया, रायगड- रत्नागिरी- सिंधुदुर्ग, नाशिक, वर्धा- चंद्रपूर- गडचिरोली, अमरावती, धाराशिव- लातूर- बीड, परभणी- हिंगोली आणि छत्रपती संभाजीनगर- जालना या १६ मतदारसंघांमधल्या सदस्यांचा कार्यकाळ संपल्यानं ही निवडणूक होणार आहे. यासोबतच चंद्रशेखर बावनकुळे हे विधानसभेत निवडून आल्याने रिक्त झालेल्या एका जागेसाठीही निवडणूक होणार आहे. याबाबतची अधिसूचना येत्या २५ तारखेला जारी होईल. १ जूनपर्यंत उमेदवारी अर्ज दाखल करता येतील, तर ४ जूनपर्यंत उमेदवारी मागे घेता येईल. मतदान १८ जून रोजी होणार असून २२ जूनला मतमोजणी होईल. याबरोबरच संबंधित क्षेत्रात आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे.

---------------------------------------------

राज्यमंत्री रामदास आठवले

केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी आज नागपूर दौऱ्यात विदर्भ विभागीय समाज कल्याण विभागाचा आढावा घेतला. मागासवर्गीय विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या भारत सरकारच्या शिष्यवृत्तीत भारत सरकारचा वाटा 60 टक्के करण्यात आला असून राज्याचा वाटा 40 टक्के आहे अशी माहिती यावेळी त्यांनी पत्रकार परिषदेत दिली. सन 24-25 मध्ये विदर्भात 422 आणि 25-26 मध्ये 458 ॲट्रॉसिटीच्या घटना घडल्या असून, दलित कुटुंबातील कुणाचा खून झाला असल्यास त्या घरातील एकाला राज्य सरकारकडून नोकरी दिली जाते. अशा घटनापैकी 77 जणांना विदर्भात नोकरी मिळाली आहे, असं आठवले यांनी सांगितलं. तसंच 70 शासकीय वसतीगृहात 7160 विद्यार्थी शिकत असून ज्या विद्यार्थ्यांना वसतीगृहात प्रवेश मिळत नाही अशा विद्यार्थ्यांना स्वाधार योजने

अंतर्गत वर्षाला 60 हजार रुपये मिळत असून नागपुरात 5 हजार 120 विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळत आहे अशी माहिती त्यांनी दिली. जनगणनेत धर्मांतरीत बौद्धांनी धर्म बौद्ध आणि अनुसूचित जातीतील जात नोंदवावी अस आवाहन देखील त्यांनी यावेळी केलं. विदर्भात आंतरजातीय विवाहाचं अधिक प्रमाण ही स्वागतार्ह बाब असल्याचं आठवले यांनी यावेळी सांगितलं.-

***(होल्ड बाईट - आठवले- २५ सेकंद)***

---

नीट पेपर फुटी

नीट यूजी पेपरफुटी प्रकरणी लातूर शहरातल्या रेणुकाई केमिस्ट्री क्लासेस चालवणाऱ्या शिवराज मोटेगावकर या संचालकाला सीबीआयने पुण्यातून अटक केली आहे. काल या प्रकरणाच्या चौकशीत मोटेगावकर यांच्या मोबाईल फोनमध्ये नीट परीक्षेची फुटलेली प्रश्नपत्रिका सापडली. त्यामुळे आज अटकेची कारवाई करण्यात आली. या प्रकरणात सीबीआयने मोटेगावकर यांची ११ तास चौकशी केली. त्यानंतर त्यांच्या लातूर इथल्या प्रशिक्षण केंद्रात शोधमोहीम राबवून सीबीआयने संशयित दस्तऐवज, संगणक आणि मोबाईल फोन जप्त केले. या प्रकरणात सहभागी असणाऱ्या टोळीचे मोटेगावकर हे सक्रिय सदस्य असल्याचा संशय आहे. मोटेगावकर यांनी इतर आरोपींशी संगनमत करून २३ एप्रिल रोजी होणाऱ्या परीक्षेपूर्वी ही प्रश्नपत्रिका मिळवून अनेक जणांना दिली, असं सीबीआयनं म्हटलं आहे.

---

विशिष्ट ओळख प्राधिकरण

वरिष्ठ आयएएस अधिकारी सौरभ विजय यांनी आज भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरण अर्थात यूआयडीएआयच्या मुख्य कार्यकारी अधिकारीपदाचा कार्यभार स्वीकारला. १९९८ बॅचचे महाराष्ट्र कॅडरचे आयएएस अधिकारी असलेले सौरभ विजय यांनी राज्य शासन तसेच केंद्र शासनात विविध महत्त्वाच्या पदांवर काम केल आहे. राष्ट्रपती सचिवालयात संचालक तसेच अमेरिकेतील जागतिक बँकेत भारतासह चार देशांच्या कार्यकारी संचालकांचे सल्लागार म्हणूनही त्यांनी महत्त्वपूर्ण जबाबदाऱ्या सांभाळल्या आहेत.

---

केरळ मुख्यमंत्री

केरळमध्ये संयुक्त लोकशाही आघाडीचे मुख्यमंत्री म्हणून काँग्रेसचे व्ही. डी. सतीशन यांनी आज शपथ घेतली. थिरुवनंतपुरममध्ये राज्यपाल राजेन्द्र आर्लेकर यांनी त्यांना पद आणि गोपनियतेची शपथ दिली.

---------------------------------------------

बनावट नोटा

गडचिरोली पोलिसांनी नागपुरातील एका फ्लॅटमध्ये बनावट नोटा छापून त्या चलनात आणण्याचा प्रयत्न करणाऱ्या चौघांना अटक केली आहे. प्रमोद कोवे याने १०० रुपयांच्या २१ बनावट नोटा एटीएममध्ये जमा करण्याचा प्रयत्न केला असता हा प्रकार उघडकीस आला. चौकशीतून पोलिसांनी नागपुरातील फ्लॅटवर छापा टाकून छपाईसाठी वापरलेले साहित्य जप्त केले. यामध्ये कलर प्रिंटर, बॉण्ड पेपर, कटर आदींचा समावेश आहे.  सर्व आरोपींना न्यायालयाने सहा दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे.

---------------------------------------------

आदि कर्मयोगी अभियान

चंद्रपूर जिल्ह्यात आदिवासी बांधवांच्या सामाजिक आणि  आर्थिक विकासासाठी 'आदि कर्मयोगी अभियान' अंतर्गत १८७ गावांमध्ये आदि सेवा केंद्रांची स्थापना करण्यात आली असून आता पुढील टप्प्यात 'जन भागिदारी अभियान' राबविण्यात येणार आहे. १८ ते २५ मे  दरम्यान विविध शिबिरं  आणि  उपक्रमांच्या माध्यमातून आदिवासी नागरिकांना शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यावर भर दिला जाणार आहे.

---------------------------------------------

पेट्रोल-डिझेल टंचाई

वाशिम जिल्ह्यात प्रचंड उष्णतेसोबतच पेट्रोल-डिझेल टंचाईचे दुहेरी संकट नागरिकांसमोर उभे ठाकले आहे. सलग चौथ्या दिवशी इंधनटंचाई कायम असल्याने पेट्रोल पंपांवर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या असून शेतकरी इंधनाची प्रतीक्षा करत आहेत. खरीपपूर्व मशागतीची कामे डिझेलअभावी ठप्प होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

---------------------------------------------

उष्माघात

अकोला जिल्ह्यातील तेल्हारा तालुक्यात उष्माघातामुळे दुसऱ्या मृत्यूची घटना समोर आली असून, पिंपरखेड येथील ५० वर्षीय रामेश्वर जांभळे यांचा मृत्यू झाला आहे.ते

दानापूर ते वारखेड मार्गावर जात असताना झाडाखाली बेशुद्ध अवस्थेत आढळले. त्यांना ग्रामीण रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी मृत घोषित केले.शवविच्छेदनानंतर मृत्यू उष्माघातामुळे झाल्याचं स्पष्ट झालं असून, तालुक्यात उष्णतेच्या लाटेमुळे नागरिकांमध्ये चिंता वाढली आहे.

-------------------------------------------

हवामान

विदर्भात आज अकोला इथं सर्वाधिक ४६.३ दशांश अंश इतकं तापमान नोंदवण्यात आलं. विदर्भात आज अमरावती जिल्ह्यात दुपारी अडीच वाजता मोजलेल्या तापमानानुसार सर्वाधिक 45 पूर्णांक ६ दशांश अंश सेल्सिअस इतक्या कमाल तापमानाची नोंद करण्यात आली. त्यापाठोपाठ वर्धा इथं 45.4 दशांश अंश सेल्सिअस इतकं कमाल तापमान नोंदवण्यात आलं. नागपुरात आज 43 अंश सेल्सिअस इतक्या कमाल शुष्क तापमानाची नोंद झाली. तर बुलढाणा, ब्रह्मपुरी, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया या सर्व जिल्ह्यांमध्ये तापमान 42 ते 43°c दरम्यान नोंदवण्यात आलं. विदर्भातील अत्याधिक उष्णतामानामुळे आज अकोला, अमरावती, वर्धा आणि यवतमाळ या जिल्ह्यांना उष्णतेच्या लाटेचा ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला असून हा अलर्ट उद्या देखील अकोला, अमरावती आणि वर्धा या जिल्ह्यांमध्ये कायम राहणार आहे. दरम्यान, आज गोंदिया, चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यात वादळी पर्जन्यमान राहू शकतं असा अंदाज नागपूरच्या प्रादेशिक हवामान विभागाने व्यक्त केला आहे.तीव्र उष्णतेमुळे वाढत्या उष्माघाताच्या धोक्याच्या पार्श्वभूमीवर आयुष मंत्रालयाने नागरिकांसाठी व्यापक आरोग्य सल्ला जारी केला आहे. पुरेसे पाणी पिणे, कडक उन्हात बाहेर जाण टाळणे, हलके सूती कपडे परिधान करणे तसेच हंगामी फळे आणि इलेक्ट्रोलाइटयुक्त पेयांचे सेवन करण्याचा सल्ला देण्यात आला आहे. चक्कर येणे, डोकेदुखी, निर्जलीकरण, बेशुद्धावस्था यांसारखी लक्षणे दिसल्यास तातडीने सतर्क राहून गंभीर परिस्थितीत १०८ आणि १०२ हेल्पलाइनवर संपर्क साधण्याच आवाहन करण्यात आल आहे.

-------------------------------------------

आय पी एल

आय पी एल क्रिकेट स्पर्धेत आज चेन्नई मधल्या चिदंबरम स्टेडिअमवर यजमान चेन्नई सुपर किंग्जचा मुकाबला सनरायझर्स हैदराबादशी होणार आहे. संध्याकाळी साडे सात वाजता सामन्याला सुरुवात होईल. या स्पर्धेत सध्या १४ गुण मिळवून

सनरायझर्स हैदराबाद तिसऱ्या स्थानावर आहे, तर चेन्नई सुपर किंग्ज १२ गुणांसह पाचव्या स्थानावर आहे.

---------------------------------------------